उत्तर :- अ) शहाजहानची कारकीर्द 'सुवर्णयुग' :-

जेव्हा एखाद्या काळात राजकीय स्थैर्य निर्माण झाले असेल, तसेच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व कलाविषयक क्षेत्रात सर्वांगीण भरभराटीचा व शांततेचा काळ आलेला असतो त्या कालखंडात 'सुवर्णयुग कालखंड' म्हणून ओळखले जाते. हा दृष्टीकोन बाळगणाऱ्या विद्वान व इतिहासकारांमध्ये प्रामुख्याने साफीखान, मनुची, वर्नियर, एल्फिन्स्टन, लेनपूल, एम. पी. त्रिपाठी, श्रीराम शर्मा व सक्सेना यासारख्या परकीय व भारतीय इतिहासकारांचा समावेश होतो.

कारणे :-

(१) तुलनात्मकदृष्ट्या अधिक शांतता व सुव्यवस्थेचा काळ :-

सम्राट शहाजहानची कारकीर्द तुलनात्मकदृष्ट्या अधिक शांतता व सुव्यवस्थेची कारकीर्द होती. प्रारंभीच्या काळात घडून आलेली बंडे, मध्य आशियातील व दक्षिणेतील साम्राज्य विस्तारासाठी काढण्यात आलेल्या मोहिमांचा अपवाद वगळता त्याच्या काळात शांतता होती. राज्यकारभार व सुव्यवस्था टिकून राहिली. हा राजकीय स्थैर्याचा काळ म्हणून ओळखला जातो. ट्रॅव्हर्नियर म्हणतो शहाजहानच्या काळात व्यापारी व प्रवाशांना कसलीच भीती नव्हती. ते सुरक्षितपणे प्रवास करू शकत असत. या काळातच राजपुतांनी आपली एकनिष्ठ वृत्ती मोगल सेनेप्रती दाखवून दिली होती. या काळात मोगल साम्राज्यास कोणत्याही गंभीर समस्येने ग्रासलेले नव्हते.

Scanned with OKEN Scanner

(२) आर्थिक सुबत्ता व वैभव :-

इतिहासकार मोरलँड याने शहाजहानची कारकीर्द शेती व्यवसायास अनुकूल ठरल्याचे वर्णन केले आहे. शेती उत्पादन वाढल्यामुळे समाजात आर्थिक समृद्धी निर्माण होऊ शकली. राज्याच्या खजिन्यात दरवर्षी ४५ कोटी रूपये जमा होत असत. याशिवाय खजिन्यात सोने, चांदी, हिरे, मोती व रत्नांचा मोठा साठा शिल्लक होता. आर्थिक समृद्धीमुळेच त्याच्या काळात भव्य इमारती व इतर क्षेत्रांतील प्रगती घडून येऊ शकली. दक्षिण भारत व गुजरातमध्ये भयंकर मोठा दुष्काळ पडल्यानंतर देखील त्या दुष्काळावर आर्थिक सुबत्तेमुळे मात करणे शक्य झाले.

(३) स्थिर सरकार व समान न्याय :-

प्रजेला समान न्याय पद्धतीने वागविले जात होते. कोणावरही अन्याय होणार ह्याची राजाने हमी घेतलेली होती. सामान्य प्रजेला लोकन्यायालय भरवून न्याय मिळवून देण्याची सोय केलेली होती, अन्याय झालेल्या व्यक्तीस प्रत्यक्ष राजाकडे दाद मागण्याची सोय होती. मनुची या प्रवाशाने केलेल्या वर्णनानुसार शहाजहान वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील शिक्षा देत असे.

(४) अंतर्गत व बाह्य व्यापारात वाढ :-

त्या काळात आपल्या देशातील माल पूर्व आफ्रिका, मध्य आशिया व युरो खंडातील देशात पाठविला जात असे. कापूस, कापड, रेशीम, औषधी व लोणी परदेशा पाठविले जात असे. पश्चिम किनाऱ्यावरील सुरत हे एक प्रमुख बंदर बनले होते.

(५) साहित्य व कलेच्या क्षेत्रातील प्रगती :-

दरबारी कवी, लेखक व कलाकारांना त्याने राजाश्रय दिलेला होता. सोन्या-चांदी दागिने तयार करणारे कुशल कारागीर, मातीची कलाकुसर असलेली भांडी, धातूवर कोरीवकाम करणारे कारागीर यांना प्रोत्साहन दिले. कलेप्रमाणे साहित्य क्षेत्रात फारसी संस्कृत व हिन्दी भाषेतून साहित्यनिर्मिती करणारे अनेक श्रेष्ठ लेखक व कवी या काळा होऊन गेले. अब्दुल हमीद लाहोरी हा दरबारी इतिहासकार होता. जगन्नाथ पंडित एक श्रेष्ठ कवी त्याच्या दरबारात होता. कवींद्र आचार्य सरस्वती या हिन्दी व संस्कृ भाषेतून कविता करणाऱ्या नामांकित कवीचा त्याने सत्कार करून आर्थिक मदत दि होती. याशिवाय त्याने अनेक वैद्य, ज्योतिषी, खगोलशास्त्रज्ञ, गणितज्ञ, संगीतकार, गाय यांचाही सत्कार करून आर्थिक मदत दिली. अब्दुल हमीद लाहोरी याने लिहिलेला ग्रं 'बादशहानामा' व मोहम्मद हाशिम खल्फिखान याचा ग्रंथ 'मुन्तखाब-उल-लुआब-मुहम्मदशाही' हे दोन इतिहास विवेचन करणारे ग्रंथ त्याच्या काळातील इतिहासकारांनीच लिहिले.

(६) बांधकाम व स्थापत्य कलेतील अद्वितीय प्रगतीचा काळ :-

दिल्लीचा लाल किल्ला, 'दिवाण-ए-आम', 'दिवाण-ए-खास', जामा मशिद, मो मशिद तसेच आग्रा येथील जगप्रसिद्ध ताजमहाल या इमारती त्याच्याच काळात निर्मि झाल्या. तलाव, कालवे, बागबगिचे, राजवाडे, स्मारके इत्यादींची निर्मिती त्याच्याच काळा झाली. या निर्मितीमुळे त्याला 'बांधकामाचा राजा' असे म्हटले जाते.

शहाजहानच्या वास्तूमध्ये भव्य ... सोन्याचे आकर्षक घुमट, नक्षी

Scanned with OKEN Scanner

जाळीकाम, आकर्षक कलाकुसरी, रंगसंगतीचे वैभव इत्यादी वैशिष्टये पहावयास मिळतात.

**(७) धार्मिक समन्वयाचे धोरण किंवा धार्मिक सहिष्णुतेचे धोरण :-**

शहाजहान हा अकबराप्रमाणे उदारमतवादी व सर्वधमसमभाव बाळगणारा नसला तरी तो धार्मिक पक्षपात किंवा कडवा धर्माभिमान बाळगणारा नव्हता. त्याने राज्यकारभार करताना धर्मभेद न करता पात्रतेनुसारच नेमणुका दिल्या. सामान्य जनास धार्मिक कारणावरून त्रास दिला नाही. त्याच्या कारकिर्दीत धार्मिक पक्षपाताच्या काही घटना घडून आल्या तरी त्या राजकीय कारणातून घडून आलेल्या होत्या धर्मप्रसाराच्या भावनेतून नव्हे. जगन्नाथ पंडितांसारख्या अनेकांना त्याने आपल्या दरबारात आश्रय दिला.

**(८) शहाजहानचा पालक म्हणून प्रजाहितदक्ष दृष्टीकोन व लोकोपयोगी कामे :-**

शहाजहानने कलेला प्रोत्साहन दिले, प्रजेच्या अडचणी सोडविण्यासाठी त्याने लक्ष पुरविले. दक्षिण भारत व गुजरातमध्ये दुष्काळ पडला. त्या काळातील शेतसारा त्याने शेतकऱ्यांना माफ केला. सरकारी अन्नछत्रे चालू केली व इतर प्रांतातून अन्नधान्य आणण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. अनेक लोकोपयोगी कामे त्याने सुरू केली.

**शहाजहानची कारकीर्द सुवर्णयुग नव्हे :-**

शहाजहानचा काळ हा सुवर्णयुग मानता येणार नाही, कारण या कारकिर्दीत अनेक विरोधी घटना घडून येत होत्या. त्यामुळे साम्राज्याचा विकास होण्याऐवजी ऱ्हास व्हावयास प्रारंभ झाला असे मत प्रामुख्याने व्ही. ए. स्मीथ, एडवर्डस् गॅरेट आणि आशिर्वादीलाल श्रीवास्तव यांनी व्यक्त केलेले आहे.

**१] धार्मिक क्षेत्रातील असहिष्णुता :-**

सम्राट शहाजहानच्या कारकिर्दीत अगदी प्रारंभीपासून धार्मिक क्षेत्रातील सम्राट अकबराचे धोरण सोडून दिल्याचे दिसून येते. शहाजहान हा दक्षिणेचा सुभेदार असतानाच त्याने शिया राज्याविरूद्ध युद्धमोहिमा काढलेल्या होत्या. राज्यावर आल्यावर सुरूवातीच्या काळातच त्याने एक आदेश काढून मंदिरे बांधण्यास प्रतिबंध केला व नवीन बांधलेली मंदिरे पाडण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार अलाहाबाद प्रांतातील बनारस जिल्ह्यातील ७२ मंदिरे पाडण्यात आलेली होती. त्याने इस्लाम धर्माच्या प्रसारास प्रोत्साहन दिलेले होते. इस्लाम धर्मियांना इतर धर्मात प्रवेश घेण्यास बंदी घातली. तसेच अकबराने रद्द केलेला यात्राकर पुन्हा हिंदूंवर लादला. त्याचप्रमाणे शहाजहानने हिंदू-इस्लाम धर्मियातील विवाहावर बंदी घातली होती. एवढेच नव्हे तर हिंदू पुरुषाने मुस्लिम स्त्रीबरोबर लग्न केले असेल तर अशा हिंदू किंवा बिगर इस्लामी व्यक्तीस सक्तीने इस्लाम बनविण्याचे धोरण अंमलात आणले होते. शहाजहान स्वतः कट्टर सुन्नीपंथी होता त्यामुळे त्याचा दृष्टीकोन किंवा धोरण अकबराप्रमाणे उदारमतवादी राहणे शक्य नव्हते. ही धार्मिक धोरणातील पीछेहाट होती व अनेक कारणांपैकी मोगल साम्राज्याच्या पतनास तो अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरला होता. डॉ. ए. एल. श्रीवास्तव या इतिहासकाराने व्यक्त केलेल्या मताप्रमाणे, "शहाजहानने धार्मिक कट्टरतेची बीजे पेरली होती. त्यानुसार नंतरच्या काळात औरंगजेबाने कहरच केला

Scanned with OKEN Scanner

विषमतेमुळे प्रजा असंतुष्ट बनली.

**८] आर्थिक घसरगुंडीस प्रारंभ :-**

मध्य आशियातील मोहिमा, सतत चालू असलेले भव्य इमारतींचे बांधकाम खर्च, सैन्य व राज्यकारभारातील अफाट खर्च इत्यादी बाबींमुळे शहाजहानची कारकीर्द आर्थिक दिवाळखोरी करणारी ठरली होती. बर्नियर याने, "अनेक वेळा सुभेदारांच्या गैरकारभारामुळे सामान्य लोकांना आपल्या जीवनावश्यक वस्तूंच्या अडचणी सोडविणेही कठीण होत असे." अशा स्वरूपाचे वर्णन केलेले आढळते. व्हिन्सेंट स्मीथ अनुसार, "शहाजहान हा व्यक्ती व राज्यकर्ता या दोन्हीही दृष्टींनी अपयशी ठरला होता."

कला, साहित्य, स्थापत्य व बांधकाम या विशिष्ट क्षेत्रापुरता विचार करता त्याची कारकीर्द सुवर्णयुग होती असे म्हणता येईल; परंतु एकूण कारकिर्दीचा विचार करता त्याची कारकीर्द वैभव व अधोगतीची लक्षणे प्रदर्शित करणारी विरोधाभासाची कारकीर्द असे म्हणता येईल.

**प्रश्न ४ था :- शहाजहानच्या दक्षिणविषयक धोरणाचे परीक्षण करा.**

उत्तर :- सम्राट शहाजहान सत्तेवर आला त्यावेळी दक्षिण भारतातील एकंदर परिस्थिती राजकीयदृष्ट्या अस्थिरच होती, सम्राट जहांगीरच्या काळात दक्षिणेत सुभेदार असलेल्या राजपुत्र शहाजहानने दोन वेळा अहमदनगरच्या पंतप्रधानास तह करण्यास भाग पाडलेले होते. राजधानी अहमदनगर व बालाघाट मोगली साम्राज्यात सामील केलेली होता. इ. स. १६२१ मधील तहानुसार मोगलांनी पूर्वी गमावलेले सर्व प्रदेश परत मिळविलेले होते. खानदेश, अहमदनगर राज्याचा राजधानी अहमदनगरसह अर्धा भाग मोगली साम्राज्यात सामील करण्यात आलेला होता. विजापूर व गोवळकोंड्याच्या सुल्तानांनी खंडणी देऊन मांडलिकत्व स्वीकारलेले होते; परंतु शहाजहानचे बंड (इ. स. १६२३ ते इ. स. १६२६) व महाबतखानाचे बंड या अस्थिरतेचा फायदा दक्षिणेतील सत्तांनी घेतला. त्यामुळे जहांगीरचे विजय नाममात्रच राहिले. दक्षिणेतील सत्तांनी पूर्वीचे करार धुडकावून लावले.

शहाजहान सत्तेवर आल्यावर त्याने सर्वप्रथम दक्षिणेचा सुभेदार खानजहान लोदीचे बंड मोडून काढले. शहाजहान इ. स. १६२९ ते इ. स. १६३२ पर्यंत दक्षिणेत होता. निजामशाहीतील घडामोडींमुळे शहाजीराजे भोसले व इतर मराठा सरदार मोगलांना मिळाले. परंतु पुढे फत्तेखानच्या फितुरीमुळे व मोगलांबरोबर गुप्त संधान ठेवल्यामुळे शहाजीराजे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोगलांची बाजू सोडली; परंतु निजामशाहीच्या अंतर्गत कटकारस्थानांमुळे नोव्हेंबर १६३६ मध्ये निजामशाही राज्य कायमचे मोगल साम्राज्यात विलीन झाले. गोवळकोंड्यानेही एप्रिल १६३६ मध्ये मोगलांशी तह करून वार्षिक ६ लाख रूपये खंडणी देण्याचे मान्य केले. विजापूरच्या आदिलशाहीनेही मे १६३६ मध्ये मोगलांशी खालीलप्रमाणे तह केला.

[१] मोहम्मद आदिलशहाने मोगलांचे मांडलिकत्व स्वीकारले.

[२] २० लाख रूपये खंडणी देण्याचे मान्य केले.

[३] शहाजीराजांविरूद्ध युद्धात मदत करण्याचे मान्य केले.

[४] गोवळकोंड्याच्या राज्यकारभारात हस्तक्षेप न करण्याचे मान्य केले.

Scanned with OKEN Scanner